महाराष्ट्र शासन

क्रमांक:एसएसएन-१०९१/२८८८/माशि-१,
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक :- ३ फेब्रुवारी, १९९२.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई/
नाशिक/पुणे/कोल्हापूर/औरंगाबाद/
नागपूर / अमरावती.

विषय :- १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत [इंग्रजी माध्यम].

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून, सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी इंग्रजी माध्यमातून जून, १९९१ पासून कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना अनुदान संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

अ] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ब] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

क] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ.बी.सी.च्या ]फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेवून कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत

Received directly from B'bay on 8th Feb. 92

कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

४. ज्या संस्थांना परवानगी आदेश मिळाल्यानंतर शाळा सुरु करणे शक्य होणार नाही, अशा संस्थांनी १९९२-९३ पासून नूतनीकरणाबाबत फेब्रुवारी, १९९२ पूर्वी शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. असे संबंधित संस्थांच्या परवानगी आदेशात नमूद करावे.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरित पाठविण्यात यावा.

[ आय. एम. मोरे ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना :-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षणाधिकारी [ माध्यमिक ], जिल्हा परिषद [ संबंधित ].
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. शिक्षण उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
निवड नस्ती, माशि-१ [ १९९१ ].
शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग.
एसबीएस-१.२

(17)

## विवरणपत्र

शासन पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एसएसएन १०९१/२८८८/माशि-१, दिनांक ३.२.९२ चे सहपत्र.

१९९१-९२ या शैक्षणिक वर्षात [जून १९९१ पासून] कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी द्यावयाच्या नवीन माध्यमिक शाळांची यादी [इंग्जी माध्यम ]

| क्रमांक | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | जि. बृहन्मुंबई | | | |
| १. | कॉन्टिन्युशन एज्युकेशन सेंटर, मुंबई ३२ | काळाचौकी | पाचवी | इंग्जी |
| २. | महाराज एज्यूकेशन फौंडेशन, ट्रान्झीट कॅम्प, धारावी मुंबई १७ | जैन सोसायटी सायन एफ नॉर्थ विभाग | आठवी | -"- |
| ३. | श्री. विनायक विद्यादायिनी ट्रस्ट, आकसागांव, मालवणी. | आकसा व्हिलेज खारोडी | पाचवी ते सातवी | -"- |
| ४. | चंदूलाल नानावटी वुमेन्स, इन्स्टिटयूट अ‍ॅण्ड गर्ल्स हायस्कूल, विलेपार्ले [पू.] | विलेपार्ले | पाचवी व सहावी | -"- |
| ५. | आंध्र कर्नाटक दलित वर्ग संघ, मुंबई. | धारावी | पाचवी व आठवी | -"- |
| | जि. नाशिक | | | |
| ६. | दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, नाशिक, रोड, देवळाली. | जेलरोड नाशिक | आठवी | -"- |
| | जि. ठाणे | | | |
| ७. | विद्यादर्पण एज्युकेशन सो सोसायटी, अचानक नगर, मुंब्रा. | कौसा मुंब्रा | आठवी | -"- |

....२..

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ८. | दि दिगंबर जैन मित्रमंडळ<br>व्दारा राजा कन्स्ट्रक्शन<br>म. गांधी मार्ग, मुलुंड | किसननगर<br>ठाणे. | आठवी | इंग्रजी |
| ९. | साई ट्रस्ट, कल्याण | डोंबिवली[प.] | -"- | -"- |
| १०. | श्री. सदगुरु वामनबाबा<br>महाराज शिक्षण प्रसारक मंडळ,<br>आयरे, डोंबिवली. | आयरेगाव<br>डोंबिवली. | -"- | -"- |
| ११. | समाज शिक्षण प्रसारक<br>मंडळ, ठाकूर्ली | चोळेगाव<br>[ठाकूर्ली[पू] | -"- | -"- |
| १२. | राजे शिवाजी एज्युकेशन<br>इन्स्टीटयूट खडेगोळोवली. | खडेगोळोवली,<br>कल्याण | -"- | -"- |

जिल्हा पुणे
==========

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३] | संयुक्त स्त्री संस्था,<br>राजेंद्रनगर, पुणे. | राजेंद्रनगर,<br>पुणे | आठवी | इंग्रजी |
| १४] | डेक्कन एज्युकेशन<br>सोसायटी, पुणे-४ | न्यु. इं. स्कूल<br>आवार, पुणे शहर | -"- | -"- |
| १५] | बन्सीलाल रामलाल<br>अगरवाल ट्रस्ट, पुणे | बिबवेवाडी | -"- | -"- |
| १६] | डॉ. विखे पाटील फौंडेशन, पुणे | २७०-भांबुर्डे,<br>पुणे शहर | -"- | -"- |

जि. रायगड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७] | इंडियन एज्युकेशन<br>सोसायटी, दादर. | न्हावा शेवा<br>पोर्टस<br>टाऊनशिप,<br>ता. उरण | -"- | -"- |